पूर्वांचलाची चित्र सफर - भाग ३

तवांगला गेल्यावर एकसारखी खुणावत राहते ती तिथली चारशे वर्ष जुनी मॉनेस्ट्री. चारशे वर्ष जुनी असली तरी अगदी साफ आणि लखलखीत, कालच रंगवल्यासारखी. तवांगचं हे एक आकर्षण. आनंदात वावरणारे बौध्द लामा आणि गूढ शांतता. दलाई लामांनी अलिकडेच या भागाला भेट दिली. हाच तो प्रदेश ज्याच्यावर चीनचा डोळा आहे.



मी तवांगला गेलो तो मुख्यत: तिथल्या तळ्यांसाठी. 'तळ्यांचं तवांग' हा लेख लोकसत्तामध्ये वाचल्यापासून मला तवांगला जाण्याची ओढ लागून राहिली होती. तवांगला पोहोचल्यावर ही तळी पहावी म्हणून चौकशी केली तेव्हा समजलं की अजून दोन अडीच हजार फूट उंच आणि सतरा किलोमीटर गेल्यावर ही तळी पहायला मिळतील. तसे निघालो आणि १०८ तळ्यांचा हा रम्य देखावा पाहताना भान हरपून गेलं.



- नरेंद्र प्रभू
www.prabhunarendra.blogspot.com
www.shabdashabda.blogspot.com